(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email :ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. ०२२ - ६९८५२२३४
सी. आय. एन. नं. U40109MH2005SGC153645

जा. क्र. औसंवि/अ/ई.पी.एस.९५/ **४३६५** दिनांक: **१६.०२.२०२३**

# परिपत्रक

**विषय**: कर्मचाऱ्यांच्या प्रत्यक्ष वेतनावर (Actual Salary) कर्मचारी निवृत्ती वेतन योजना (EPS-95) लागू करण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ०४.११.२०२२ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत.

**संदर्भ** : १) मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी SLP (C) Nos. 8658-8659 of 2019 यावर दि.०४.११.२०२२ रोजी दिलेला निर्णय.
२) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, मुख्य कार्यालय, नवी दिल्ली, यांचे परिपत्रक क्र. Pension/२०२२/५४८७७/१५१४९ दि. २९.१२.२०२२
३) सचिव, म.रा.वि.मंडळ, भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ यांचे पत्र क्र. AD/PF/Pension/D/४ दि. ०४.०१.२०२३
४) म.रा.वी. मंडळ सूत्रधारी कंपनीचे पत्र क्र. DF/MSEBHCL/EPS-९५/००२ दि. ०९.०१.२०२३
५) मा. उच्च न्यायालय, मद्रास यांचे रिट याचिका क्र. ५४२४/२०२२ दि. २५.०१.२०२३ नुसार दिलेला निर्णय.

******

मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या SLP (C) Nos. 8658-8659 of 2019 यावर दि.०४.११.२०२२ रोजी दिलेल्या निर्णयानुसार कर्मचाऱ्यांच्या कमाल वेतन मर्यादा रक्कम रु. १५,०००/- (यापूर्वीची कमाल वेतन मर्यादा रु. ५०००/- तसेच रु. ६५००/-) वेतनावर पेन्शन फंड वर्गणी ८.३३% प्रमाणे कपात करण्याऐवजी प्रत्यक्ष वेतनावर (Actual Salary ) कपात करण्याचा निर्णय दिलेला आहे.

२. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ०४ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या आदेशाच्या परिच्छेद ४४ (२) नुसार २०१९ च्या एस एल पी क्रमांक ८६५८-८६५९ मध्ये, अधिसूचनाद्वारे आणलेल्या कर्मचारी निवृत्ती वेतन योजनेतील सुधारणा जी एस आर ६०९ (ई) दि. २२ ऑगस्ट २०१४ रोजी नियमित आस्थापनांच्या (Regular Establishment) कर्मचाऱ्यांप्रमाणेच सूट दिलेल्या आस्थापनांच्या (Exempted Establishment) कर्मचाऱ्यांना देखील लागू राहील.

३. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार महावितरण कंपनीतील जे कर्मचारी दि. ०१ सप्टेंबर २०१४ रोजी कर्मचारी निवृत्ती वेतन योजना - १९९५ (EPS-95) योजनेचे सदस्य होते/आहेत आणि कर्मचारी निवृत्ती वेतन योजना - १९९५ (EPS-95) अंतर्गत निवृत्ती वेतन (Pension) प्रत्यक्ष वेतनावर घेण्यासाठी इच्छुक आहे, त्यांना मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार प्रत्यक्ष वेतनावर निवृत्ती वेतनाचा (Pension) लाभ मिळविण्यासाठी सोबतच्या नमुन्यात संयुक्त पर्याय अर्ज (Joint Option Form) आणि घोषणापत्र- अ (Annexure - A) भरून जमा करणे आवश्यक आहे.

४. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयातील परिच्छेद ४४ (V) अन्वये जे कर्मचारी परिच्छेद ११ (३) अंतर्गत कोणताही विकल्प न वापरता सप्टेंबर २०१४ पूर्वी सेवानिवृत्त झाले आहेत अशा कर्मचाऱ्यांना मा. सर्वोच्च न्यायालयाच्या संदर्भ क्र. ०१ च्या निकालानुसार लाभ मिळणार नाही.

५. तसेच, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ०४.११.२०२२ रोजीच्या उपरोक्त निर्णयानुसार ०४ महिन्यांत म्हणजेच दि.०३.०३.२०२३ पूर्वी संयुक्त पर्यायी नमुना अर्ज (Joint Option Form) क्षेत्रीय भविष्य निर्वाह निधी कार्यालय, वांद्रे, मुंबई यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे.

६. संबंधित प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्तांकडून कर्मचारी/माजी कर्मचारी (ज्यांनी भविष्य निर्वाह निधीची ९०% किंवा १००% रक्कम घेतलेली नाही) यांच्या संयुक्त पर्याय अर्ज (Joint Option Form) स्विकारल्यानंतर अशा प्रत्यक्ष वेतनावरील मालकाचा ८.३३ % वाटा विहित व्याजासह EPFO च्या EPS-९५ योजनेत म.रा.वि.मंडळ, भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळाद्वारे (MSEB CPF Trust) जमा करण्यात येईल. तसेच, इतर माजी कर्मचाऱ्यांना EPS-९५ योजनेत (ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले) त्या संबंधीत कार्यालयाद्वारे EPS-९५ योजनेत कर्मचाऱ्यांची जमा करावयाची रक्कम कळविण्यात येईल. सदर रक्कम संबधीत कर्मचाऱ्यांस म.रा.वि. मंडळ, भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळाकडे (MSEB CPF Trust) विहीत कालावधीत जमा करावी लागेल.

७. सन- १९९५ पासून सर्व कार्यरत/सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची भविष्य निर्वाह निधी बाबतचा सर्व माहिती सचिव, म.रा.वि. मंडळ, भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ (MSEB CPF Trust) या विभागाकडून त्यांच्या पोर्टलवर **(https://cpf1.mahadiscom.in/CpfWebProject/)** CPF Dashboard Report मध्ये प्राधिकृत अधिकाऱ्यांमार्फत उपलब्ध करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे.

८. कर्मचारी निवृत्ती वेतन योजना - १९९५ परिच्छेद ११ (३) अंतर्गत पर्याय वापरून दि. ०१ सप्टेंबर २०१४ पूर्वी सेवानिवृत्त झालेले कर्मचारी निवृत्ती वेतन योजनेच्या परिच्छेद ११ (३) मधील तरतूदीनुसार संरक्षित केले जातील. कर्मचारी क्षेत्रीय भविष्य निर्वाह निधी (EPFO) कार्यालयाने सन २०१४ पूर्वी सेवानिवृत्त पात्र कर्मचाऱ्यांसाठी निवृत्ती वेतनासंबंधी निवड करण्याकरीता पर्यायी नमुना अर्ज (Online Joint Option Form) त्यांचे portal **(https://unifiedportal-mem.epfindia.gov.in/memberInterfacePohw/)** वर प्रसिध्द केलेला आहे.

त्याकरीता, PPO (Pension Pay Order) क्रमांकाची आवश्यकता असते. सदर PPO (Pension Pay Order) क्रमांकाबाबत माहिती करुन घेण्याकरीता खाली नमूद केलेली प्रक्रीया (Process) अवलंबिण्यात यावी.

https://mis.epfindia.gov.in/PensionPaymentEnquiry

⇩

Know your PPO No.

⇩

Pension Linked bank account | Member ID

⇩

MH | BAN | 0001251 | **210217** (EPS क्रमांक नोदवा)

⇩

PPO No. will display
e.g. MHBAN००११४६३३

PPO क्रमांक प्राप्त झाल्यानंतर EPFO Unified पोर्टलवर संबंधित माहिती जसे,

PPO No. _______
Name ___________
Date of Birth _______
Aadhar No. _________
Aadhar link mobile ___________
__________ Captcha नंतर
Consent Selection √
त्यानंतर, Aadhar link mobile वर OTP प्राप्त होईल,
सदर OTP टाकल्यानंतर निवड नमूना (Option Form) प्रस्तुत (Submit) केला जाईल.

९. महावितरण कंपनीमधील भविष्य निर्वाह निधी अधिनियमानुसार निवृत्तीवेतनास पात्र असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना निवृत्ती वेतन योजनेअंतर्गत माहिती :-

अ) नव्याने लागू होणाऱ्या निवृत्ती वेतन (Pension) संदर्भात माहिती.

ब) संबंधित कर्मचाऱ्यास निवृत्ती वेतन योजनेकरीता भरावी लागणारी रक्कम तसेच

क) नव्याने लागू होणारी निवृत्ती वेतनाची (Pension) वाढीव रक्कम (मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामधील नमूद मुद्दा क्र. १० प्रमाणे) इत्यादी बाबतची माहिती / तपशील CPF Portal वर पाहण्याकरीता महावितरण कंपनीतील सर्व क्षेत्रिय कार्यालयांतील मानव संसाधन विभागातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना अधिकार (Authorization) देण्यात आलेले असून पात्र कर्मचाऱ्यांनी सदरहू माहिती संबंधीत मानव संसाधन विभागाकडून प्राप्त करुन घ्यावी. याबाबत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मानव ससांधन विभागाकडून मदत केली जाईल व कंपनीतील कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी प्रत्यक्षपणे Employee Portal मध्ये CPF Report येथे Access देण्यात येईल. याकरिता क्षेत्रीय कार्यालयांतील उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी आवश्यक सहकार्य करतील.

१०. क्षेत्रिय कार्यालयांतील मानव संसाधन विभागातील संबंधित अधिकारी/कर्मचारी ज्यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्यांनी निवृत्ती वेतनास पात्र असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना वर नमूद केल्याप्रमाणे भरावी लागणारी रक्कम व नव्याने लागू होणाऱ्या निवृत्ती वेतनाच्या रकमेबाबत शहानिशा करुन स्थानिक पातळीवर संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यास त्याबाबत अवगत करावे. संबंधीत परिमंडळाचे सहा. महाव्यवस्थापक (मासं) हे नोडल ऑफिसर म्हणून या विषया संदर्भात काम करतील. तसेच, सांघिक कार्यालयाकरिता महाव्यवस्थापक (मासं-मासंव्यप्र) हे नोडल ऑफिसर म्हणून काम पाहतील.

११. महावितरण कंपनीतील सर्व क्षेत्रीय कार्यालयांमधील पात्र कार्यरत कर्मचारी यांनी त्यांचे संयुक्त पर्याय अर्ज (Joint Option Form) ०३ प्रतीत क्षेत्रीय कार्यालयांमधील संबंधित मानव संसाधन विभाग प्रमुखाकडे जमा करावेत.

१२. त्याचप्रमाणे सेवानिवृत्त/निवृत्त/राजीनामा/ स्वेच्छा सेवानिवृत्त झालेले कर्मचारी व निवृत्ती वेतनाकरिता पात्र कर्मचारी त्यांचा संयुक्त पर्याय अर्ज (Joint Option Form) संबंधित क्षेत्रीय कार्यालयामध्ये दि.२७.०२.२०२३ पर्यंत ०३ प्रतीत जमा करावेत. (जिथे त्यांची शेवटची नियुक्ती होती.)

१३. संबंधित क्षेत्रीय कार्यालयात नोडल अधिकारी म्हणून मानव संसाधन विभाग प्रमुखांकडे प्राप्त झालेल्या संयुक्त पर्याय अर्जाची (Joint Option Form) यादी Excel Sheet मध्ये तयार करतील आणि सदर यादी त्वरीत सांघिक कार्यालयास स्वाक्षरीत अर्जासहीत सादर करतील व त्याची यादी संबंधीत क्षेत्रीय कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिध्द करतील. सांघिक कार्यालयामार्फत एकत्रित यादी महावितरण कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. दि. २७.०२.२०२३ नंतर कोणत्याही परिस्थितीत कर्मचाऱ्यांचे संयुक्त पर्यायी अर्ज (Joint Option Form Online) स्विकारले जाणार नाही व त्याची कोणतीही जबाबदारी महावितरण कंपनीवर नसेल.

१४. दि. ०१.९.२०१४ नंतर सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकरीता निवृत्ती वेतनाबाबत भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडून संयुक्त पर्यायी अर्ज (Joint Option Form Online) भरण्याबाबत तरतूद नसल्याने, पूर्व तयारी म्हणून संबंधीत पात्र अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून ते कार्यरत असलेल्या कार्यालयांनी संयुक्त पर्यायी अर्ज (Joint Option Form Hard Copy) भरून घ्यावा. तथापि, याबाबत भविष्य निर्वाह निधी कार्यालयाद्वारे भविष्यात वेळोवेळी प्राप्त झालेल्या सुचना / मार्गदर्शकानुसार पुढील उचित कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

१५. संयुक्त पर्याय अर्ज (Joint Option Form) संबंधित कर्मचारी/माजी कर्मचाऱ्यांनी दि. २७ फेब्रुवारी २०२३ पर्यंत संबंधित क्षेत्रीय कार्यालयाच्या मानव संसाधन विभाग प्रमुखाकडे सादर करावा लागेल. त्यानंतर सर्व कार्यालय / क्षेत्रीय कार्यालयांतील मानव संसाधन विभागप्रमुखांनी सर्व माहिती (यादी व अर्ज) सांघिक कार्यालयांतील विशेष कक्षातील अधिकारी / कर्मचाऱ्यांकडे त्वरीत सादर करावेत.

१६. **संबंधित कर्मचारी /माजी कर्मचाऱ्यांचे संयुक्त पर्याय अर्ज (Joint Option Form) विहीत कालावधीत महावितरण कंपनी कार्यालयास प्राप्त न झाल्यास सदरच्या विलंबास व इतर परिणामास महावितरण कंपनी कार्यालय जबाबदार राहणार नाही व त्यासाठी कंपनीतर्फे कोणत्याही कारणास्तव कोणताच खुलासा / स्पष्टीकरण देण्यात येणार नाही.**

१७. कर्मचारी / माजी कर्मचारी यांनी यापूर्वी महावितरण कंपनीच्या कार्यालयात हस्ते / पोस्ट / ई-मेल इत्यादी द्वारे सादर केले असतील असे संयुक्त पर्याय अर्ज (Joint Option Form) ग्राह्य धरले जाणार नाही व ते रद्द ठरविण्यात येतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

(विशेष सूचना - विषयांकीत सुचना वाढीव पेन्शन संदर्भात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी यांच्या कार्यालयाद्वारे वेळोवेळी जाहीर केलेल्या सुचना, मान्यता आणि मार्गदर्शनाच्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ०४ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या निणर्याच्या अधिन आहेत. सदर परिपत्रक कालमर्यादेचे पालन करणे करीता उक्त निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी जारी केलेले आहे. सबब, यामुळे पात्र कर्मचाऱ्यांनी सादर / जमा केलेल्या संयुक्त पर्याय अर्ज (Joint Option Form) महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या, आणि म.रा.वि.मंडळ भ.नि.नि. विश्वस्त मंडळ यांना वाढीव निवृत्ती वेतन (Pension) देण्याचे कोणतेही अधिकार किंवा बंधन देत नाहीत.)

**सोबत :** परिशिष्ट- अ

(अरविंद भादिकर)
कार्यकारी संचालक (मासं)

**प्रती :** महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे/सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी.

**Annexure – A**

**Joint Option under Erstwhile Para 11(3) & Para 11(4) of EPS'95**
**For availing Higher Pension on actual salary instead of ceiling salary limit @ Rs. 15000/-**

To,
The Regional Provident Fund Commissioner,
Employees Provident Fund Organization,
Bandra (East), Mumbai – 400051

**Sub : Joint Option under Para 11(3) and Para 11(4) of Employees Pension Scheme, 1995 based upon the Hon'ble Supreme Court's Order in SLP N. 8658-8659 year 2019 Titled EPFO Vs Sunil Kumar pronounced on 04th November 2022 and Hon. S.C. Judgement in R.C.Gupta vs UOI (2020) 13 SCC 506 dtd. 04.10.2016 – Reg.**

Reference is invited aforesaid orders dated 04th November 2022 of Hon'ble Supreme Court of India, in the above cited Civil cases wherein the eligible employees/ex-employees and his/her employer are required to submit a joint option under erstwhile para 11(3) & 11(4) of the EPS'95 within a period of 4 months from the date of judgement.

Since no format for the joint option has been provided by EPFO (also not available on EPFO's website), based on similar formats issued by various ROs in the year 2017 & 2018 while implementing the R C Gupta judgement; in order to comply with the above requirement, we (employee/ex-employee and employer) are, here by submitting the joint option form as required under erstwhile Para 11 (3) & Para (4) of Employees' Pension Scheme-1995 for clamming pension on actual salary instead of ceiling salary limit of Rs. 15000/- .

Particulars of the employee are as under:

| Sr. No. | Particular | Details |
|---|---|---|
| 1 | Name | |
| 2 | EPS Account Number | |
| 3 | EPS Account Number Previous Organization ( if any) | |
| 4 | EPS Account Number Previous Organization (if any) | |
| 5 | EPS Account Number Previous Organization (if any) | |
| 6 | Aadhaar number | |
| 7 | UAN No. | |
| 8 | PPO Number (Pension Pay Order) | |
| 9 | Date of leaving service or attained the age of 58 years which was earlier ( if applicable) | |
| 10 | Correspondence Address | |
| 11 | E-mail id | |
| 12 | Mobile number (Aadhar Linked) | |

## I) Declaration by Employee / Ex- employee

It is certified that immediately after joining in MSEB/Maharashtra State Electricity Distribution Company Ltd., (MSEB CPF Trust), I had contributing towards the Provident Fund on my actual salary/ wages and an equal amount used to be contributed in my PF by the employer also as provided under Para 26 (6) of EPS Scheme 1952. It is to further certify that an amount @ 8.33% of the statutory ceiling amount i.e. Rs. 15000/- ( earlier Rs. 5000/- or Rs. 6500/-) out of the employer's contribution had been remitted every month towards Employees' Pension Scheme 1995 since 16th November 1995 or the date of joining whichever is later onwards.
I, do hereby opt for diverting 8.33% of my actual salary/wages out of employers' contribution towards pension fund (after adjusting the amount already diverted in EPS'95 on ceiling wages) from the date of joining the EPS'95 till my attaining the age of 58 years/VRs/resignation.

(Tick ✓ whichever is applicable)

☐ Since I have already withdrawn entire Provident Fund on my retirement/ VRS/resignation, I am ready to pay the differential amount that I had taken / withdrawn after my exit/retirement:

☐ In case my Provident Fund amount (Employer) becomes short on a/c non-refundable advance, I am ready to pay the differential amount that I had taken/ withdrawn:

Thus making me eligible for drawing pension on the basis of average of last 60 months' salary/wages as pensionable salary/ wages i.e. based on my Actual salary/wages instead of being based on the statutory limit.

That I resigned / VRS / retired on attaining the age of 58 years for the purpose of EPS 1995 after 01.09.2014 on ………….(strike out if not applicable)

I also undertake that if any other legal formality is required in this regards, I am ready to do accordingly.

Place :- Signature:-

Date:- Name:-

UAN /Member ID:-

Signature of HR Section Head

## II) Undertaking by an Employer

Shri…………………………………………...CPF No.…………………..was/is an Ex-Employee/Employee working under MSEDCL(**MSEB Estb.Code-MHBAN/1251)** and superannuate on dated ………………. The Contribution under EPS-95 has been remitted/Will be remitted to the Pension fund as per the contribution card prepared from 16/11/1995 under Paragraph 19 of the EPS-95. The Employer herewith furnished a consent to deposit 8.33% of actual salary by an individual to the Employees provident Fund Organization after an adjustment of an amount diverted on the ceiling amount of Rs.5,000/- Rs. 6,500/- and Rs. 15,000/- as the case may be to obtain benefit of pension on actual salary as per paragraph 11 (3) (Prior to 2014 amendment) & as per the paragraph 11(4) (Post amendment 2014) of EPS-95.

For **MSEB Estb.Code-MHBAN/1251**

(Authorised Signatory)

## Details of Working Employees Joint Option Form

| Sr. No. | Universal Account Number (UAN) | CPF No. | EPS No. | Name of the Employee | Location |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

## Details of Retired Employees Joint Option Form

| Sr. No. | Universal Account Number (UAN) | CPF No. | EPS No. | Name of the Employee | Location |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |